।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४२

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि ७ सप्टेंबर २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३७ वा

## पारंपारिक वाद्यांच्या गजरात बप्पांचे विसर्जन

### डीजे डॉल्बी विना सांगोल्यात मिरवणुका संपन्न



सांगोला : डीजे डॉल्बी विना पारंपारिक वाद्यांच्या गजरात हलगीच्या निनादात वाजत–गाजत सांगोला तालुक्यात लाडक्या 'बप्पा'ला शनिवार दि.७ सप्टेंबर रोजी निरोप देण्यात आला. दहा दिवस मनोभावे पूजा केल्यानंतर मनोभावे बाप्पाना निरोप देण्यात आला.मागील १० दिवस गणेशभक्तांचा उत्साह ओसंडून वाहत होता. भरल्या डोळ्यांनी गणेशभक्तांकडून आपल्या श्री.चा विसर्जन सोहळा पार पडला.

शहर व परिसरात रात्री उशिरापर्यंत आठवडा बाजारातील विहीर, सनगर गल्ली येथील विहीर, कुंभार गल्ली येथील विहीर व नगरपालिकेच्या पाठीमागील विहीरमध्ये लाडक्या बाप्पाचे विर्सजन करण्यात आले. १० दिवसांसाठी घरातील वातावरण प्रफुल्लित करणारा, घराघरात आनंद आणणारा गणपती बाप्पा आपल्या गावी निघाला. पण यावेळी गणेशभक्त भावूक झाल्याचं पाहायला मिळालं. बँड, हलगी व ढोल ताशाच्या गजरात, गुलालाच्या उधळणीत पुढच्या वर्षी लवकर येण्याचं आश्वासन घेत आणि आपल्या बाप्पाचं साजिरं रुप डोळ्यात साठवत गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. बाप्पांच्या विसर्जन मिरवणुकीचा जल्लोष सांगोलकरांना पाहायला मिळाला. ढोलताशांचा गजर. त्यावर बेभान होऊन नाचणारे भक्त. गुलालांची उधळण. बाप्पावर ठिकठिकाणी होणारी पुष्पवृष्टी आणि फटाक्यांची आतषबाजी, हे दृश्य अनुभवायला मिळाले.बाप्पाला निरोप देताना सांगोलावासीय मोठ्या उत्साहात दिसून आले.

मिरवणूक मार्गावर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे व पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी पाहणी करुन सर्व प्रमुखचौकासह मिरवणुक मार्गावर चोख बंदोबस्त तैनात केला होता. विसर्जन सोहळयामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडला नसून सर्व मंडळाच्या मिरवणुका शांततेत पार पडल्या.

विसर्जनस्थळी मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेच्या उत्कृष्ट नियोजनामुळे श्री.गणेशाच्या विसर्जनासाठी कोणत्याही अडचणी आल्या नसल्याचे गणेशभक्तांकडून सांगण्यात आले.

## माढा लोकसभा मतदारसंघाला १३ नवीन पोस्ट ऑफिसेसची मंजुरी; सांगोला तालुक्यात दोन पोस्ट ऑफीसेसचा सहभाग

सांगोला : माढा लोकसभा मतदारसंघात तब्बल १३ नवीन पोस्ट ऑफिसेस सुरू होणार असून ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ही मोठी दिलासादायक बाब ठरणार आहे. खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केंद्रीय संचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन मतदारसंघात नवीन पोस्ट ऑफिसेस सुरू करण्यासंदर्भात केलेल्या मागणीला यश मिळाले आहे.

नवीन मंजूर झालेली पोस्ट ऑफिसेस पुढील गावांमध्ये सुरू होणार आहेत सांगोला तालुक्यात वाणीचिंचाळे, सोनलवाडी; करमाळा तालुक्यात हिवरे, आळजापूर; माढा तालुक्यात गवळेवाडी; माळशिरस तालुक्यात मारकडवाडी; पंढरपूर तालुक्यात पिराची कुरोली, करोळे तसेच माण तालुक्यात कारखेल, हिंगणी, जांभूळनी, ढाकणी व सोकासन.

या निर्णयामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना बँकिंग सेवा, पत्र व्यवहार, आधार लिंकिंग, विमा योजना व इतर टपाल सुविधा गावाजवळच उपलब्ध होणार आहेत.

यामुळे शेकडो नागरिकांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाचणार आहे. ग्रामीण भागातील सामान्य माणसाला केंद्र सरकारच्या विविध योजना सहजपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी हे पोस्ट ऑफिसेस महत्त्वाची भूमिका बजावतील.अशी अपेक्षा खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केली.

## सह्याद्री फार्मसी कॉलेजच्या डॉ.मनोजकुमार पाटील व डॉ.अशपाक तांबोळी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन





सांगोला : सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार शेषेराव पाटील व प्राध्यापक डॉ.अशपाक मुबारक तांबोळी यांनी फार्मसी अभ्यासक्रमाच्या विषयावर पुस्तक प्रकाशित केले आहे. टेक्स्ट बुक ऑफ फार्मासुटिकल ऑरगॅनिक केमिस्ट्री–१ या बी.फार्मसी प्रथम वर्षाच्या दुसऱ्या सत्राच्या विषयावर त्यांनी हे पुस्तक प्रकाशित केले. पिसिआय दिल्ली यांच्या अभ्यास्क्रमाच्या मार्गदर्शक नियमानुसार त्यांनी हे पुस्तक प्रकाशित केले असून हे पुस्तक फार्मा करिअर पब्लीकेशन, नाशिक यांनी प्रकाशित केले आहे.

२००८ची स्थापित,फार्मा करिअर पब्लीकेशन हे एक नामांकित,प्रतिष्ठित व सुप्रसिद्ध पब्लीकेशन हाऊस आहे. या पुस्तकामध्ये फार्मसी क्षेत्राशी समंधित फार्मासुटिकल ऑरगॅनिक केमिस्ट्री विषयावरील सर्व मूलभूत माहिती, साध्या सेंद्रिय संयुगांचे वर्गीकरण आणि नामकरण, संरचनात्मक समस्थानिकता, अभिक्रियांमध्ये तयार होणारे मध्यवर्ती घटक, महत्त्वाचे भौतिक गुणधर्म,अभिक्रिया व संयुगांच्या तयारीच्या पद्धतींशी संबंधित आहे.अभ्यासक्रमात अभिक्रियांच्या यंत्रणा आणि अभिमुखतेवर देखील भर दिला आहे व त्याचा फार्मसी क्षेत्रास होणारा फायदा याचा समावेश या पुस्तकामध्ये केला आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना यामधून मोलाचे मार्गदर्शन व लाभ होणार आहे.

या त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार झंवले यांनी त्यांचा सत्कार करून त्यांना उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

## सर्वसामान्यांच्या स्वप्नांना मूर्त स्वरुप देण्याचा रवळनाथचा व्यापक दृष्टीकोन –श्री.एम.एल.चौगुले

### सांगोला शाखा वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न




सांगोला: रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीने वित्तीय संस्था म्हणून आदर्श निर्माण केला आहेच परंतू त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, रोजगार व सामाजिक या विविध क्षेत्रात सक्रीय योगदान देत आहे. रवळनाथच्या ग्राहक, सभासद यांना कुटुंबातील सदस्याप्रमाणेच सेवा दिली जाते. सर्वसामान्यांच्या स्वप्नांना मुर्त स्वरुप देण्याचा व्यापक दृष्टीकोन सत्यात उतरविण्याचा प्रयत्न संस्थेच्या कार्यातून सातत्याने सुरु आहे, असे प्रतिपादन रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष श्री. एम. एल. चौगुले यांनी केले.

श्री रवळनाथ को–ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचे सांगोला शाखेच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित व्याख्यान, अमृतमहोत्सवी व सेवानिवृत्त सभासद, यशवंत पाल्यांचा सत्कार व हळदी कुंकू समारंभ तसेच शिक्षक दिनानिमित्त महिला शिक्षिकेंचा सन्मान अशा संयुक्त कार्यक्रमप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून सोलापूर येथील जिव्हाळा मतिमंद मुलांची संस्थेच्या अध्यक्षा व प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ. अस्मिता बालगावकर यांनी महिलांचे मानसिक व शारीरिक आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. शाखा चेअरमन प्रा. डॉ. डी. एन. काशीद, कार्यक्रमाच्या समन्वयक व शाखा सल्लागार प्रा.डॉ. सीमा गायकवाड, सौ. सीमा घोंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. अस्मिता बालगावकर म्हणाल्या, सध्याच्या धावपळीच्या जगात व्यक्तीचे मानसिक व शारीरिक आरोग्य बिघडत चालले आहे. त्यामुळे सामाजिक व कौटुंबिक स्तरावर अनेक गंभीर समस्या निर्माण होत आहेत. नैराश्य आणि ताणतणावमुक्त जीवन जगण्यासाठी आपल्या शारीरिक आरोग्यासह मानसिक आरोग्याची काळजी घेतली पाहिजे त्यासाठी मानसोपचार तज्ञांचा सल्ला घेणे, मनमोकळा संवाद साधणे, स्वतःला वेळ देणे, छंद जोपासणे या कृतीमधून मानसिक आरोग्य उत्तम राहते यासाठी समाजात जनजागृती करायला हवी याप्रसंगी श्री.सुभाषचंद्र गायकवाड, श्री. मल्लिकार्जुन घोंगडे, श्री. यशवंत शिंदे या अमृतमहोत्सवी सभासद व प्रा. डॉ. अर्जुन मासाळ, श्री. मच्छिंद्र झंजोले, श्री. सुरेश मस्तूद, श्री. सिद्धेश्वर नवले, श्री. मारुती बोरकर या सेवानिवृत्त सभासदांचा तसेच कु. अंजली पवार, कु. आदित्य शिंदे या गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकांनी सत्कार स्विकारला. शिक्षक दिन व हळदी कुंकु समारंभाच्या निमिताने सांगोला परिसरातील महिला शिक्षिकेंचा वाण देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी शाखा चेअरमन प्रा. डॉ.डी.एन.काशीद यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. सीमा गायकवाड यांनी अतिथी परिचय करुन दिला. सौ. माधुरी जाधव व गौरी बेळगुद्री यांनी सुत्रसंचालन केले. सौ. शुभांगी घोंगडे यांनी आभार मानले. कार्यक्रमास संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. डॉ. किरण पोतदार, श्री. महेश मजती व श्रीमती उमा तोरगल्ली, सीईओ श्री. डी. के. मायदेव, सौ. सविता चौगुले, सौ. सविता चौगुले, सौ. शुभांगी करोशे, संपदा चौगुले यांच्यासह रवळनाथचे सांगोला शाखा सल्लागार, शाखाधिकारी श्री. सुशांत जिजगोंडा व सभासद, ठेवीदार, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# बाप्पाला निरोप-श्रध्दा, उत्साह आणि पर्यावरणाची जबाबदारी !

## गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या



गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा आत्मा आहे. दहा दिवस भक्तिभावाने घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांत विराजमान झालेल्या गणरायाचा निरोप म्हणजेच गणेश विसर्जन. 'गणपती बाप्पा मोरया, पुन्हा वर्षी लवकर या' या गजरात नाचत-गात, ढोल-ताशांच्या तालावर, फुलांच्या वर्षावात गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते. परंतु या जल्लोषामागे काही गंभीर प्रश्न दडलेले आहेत, जे आपण विसरतो. गणेश विसर्जन म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही. मातीपासून तयार झालेली मूर्ती जलात विसर्जित करणे म्हणजेच गणेश पुन्हा पंचतत्त्वात विलीन होणे, जीवन आणि मृत्यूच्या शाश्वत सत्याचा स्वीकार करणे होय. त्यामुळे हा विधी आत्मचिंतन व अध्यात्माचा संदेश देणारा आहे.

गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव साजरा केला जात असतो. गणेश चतुर्थीपासून गणपती बाप्पा संपूर्ण देशभर आपल्या भक्तांच्या घराघरात विराजमान होतात. गणेशोत्सव सुरू झाल्यानंतर दहाव्या दिवशी संपतो, जेव्हा मूर्ती सार्वजनिक मिरवणुकीत संगीत आणि सामूहिक मंत्रोच्चारात नेली जाते, त्यानंतर नदी किंवा समुद्रासारख्या जवळच्या पाण्यात विसर्जित केली जाते, ज्याला विसर्जन म्हणतात. गणेश विसर्जनाच्या वेळी मंत्रोच्चार केल्याने गणपती बाप्पा प्रसन्न होतो आणि भक्तांवर आशीर्वादाचा वर्षाव करतो आणि त्यांना जीवनात सुख, समृद्धी आणि आनंद देतो. घरांमध्ये आणि सार्वजनिक पंडाल (मंडप) मध्ये गणेशमूर्ती स्थापित करणे आणि त्यानंतरचे विसर्जन हे विश्वातील निर्मिती आणि विघटन चक्राचे प्रतीक आहे.

विसर्जन मिरवणुका समाजातील ऐक्याचे द्योतक आहेत. वेगवेगळ्या समाजघटकांतील, पिढ्यांतील, वर्गांतील लोक एकत्र येतात. उत्साह, गजर, नृत्य, फुलांचा वर्षाव यातून 'सामूहिक आनंद' प्रकट होतो. परंतु हाच उत्साह कधी कधी बेभान होतो आणि ध्वनीप्रदूषण, वाहतूककोंडी, अपघात अशा समस्याही वाढतात. सर्वात गंभीर बाब म्हणजे विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, रासायनिक रंग, प्लॅस्टिकच्या सजावटी या थेट नद्या, तलाव, समुद्राचे पाणी दूषित करतात. जलीय प्राण्यांचा मृत्यू होतो, पिण्याच्या पाण्यावरही परिणाम होतो. विसर्जनानंतर तलावांच्या काठावर विखुरलेले कचरे, फुलांच्या माळा, न वापरलेली सजावट हे शहराचे कुरूप चित्र दाखवतात. उत्सवाचा आनंद घेणे प्रत्येकाचे हक्क आहे. पण या आनंदासोबत निसर्गाची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे. मातीच्या मूर्तींचा वापर, नैसर्गिक रंग, कृत्रिम तलावांत विसर्जन, प्लॅस्टिक टाळणे हे उपाय आपण स्वीकारले पाहिजेत. अनेक शहरांमध्ये 'घरगुती विसर्जन तलाव' ही संकल्पना लोकांनी हळूहळू आत्मसात केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.

बऱ्याच लोकांना वाटते की, गणेशाची प्राण प्रतिष्ठापना फक्त चतुर्थीलाच होते, तर तसे नाही. काही ठिकाणी प्रतिपदेला गणरायाची प्राण प्रतिष्ठापना केली जाते. प्रतिपदेपासून दशमीपर्यंत असे १० दिवस हा उत्सव साजरा केला जातो. काही ठिकाणी गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत असे १० दिवस गणेशोत्सव साजरा होतो. गणपतीची प्राण प्रतिष्ठापना केल्यानंतर त्याची पूजा करून विसर्जन करण्याचे हे व्रत एक किंवा दीड दिवसाचे आहे. पण उत्सवात आणखी रंगत आणण्यासाठी किंवा कित्येक जण नवस पूर्ण करण्यासाठी पाच दिवस, सात दिवसांनी गणेशमूर्तीचे विसर्जन करतात. त्यामागे कोणतेही शास्त्रीय कारण नाही. गणेशभक्त आपल्या हौसेनुसार गणेशमूर्तीचे विसर्जन दीड, दोन, पाचव्या किंवा सातव्या किंवा दहाव्या दिवशी करतात. हे दिवस आनंदात-उत्साहात गेल्यानंतर गणपती बाप्पाला निरोप देण्याची वेळ येते आणि नियमानुसार प्रथेनुसार गणेशाचे विसर्जन करण्याची प्रथा आहे.

गणपती विसर्जनाशी निगडीत अनेक गोष्टी आहेत. त्यापैकी एक म्हणजेच गणपतीला जल तत्वांचा अधिपती मानलं जातं. त्यांच्या विसर्जनाचं मुख्य कारण तर हेच आहे की, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपतीची पूजा-अर्चा करून त्यांना पुन्हा पाण्यात विसर्जित केलं जातं. म्हणजेच ते ज्याचे अधिपती आहेत तिथे त्यांना पोहोचवलं जातं. निसर्गाच्या प्रत्येकच गोष्टीचे एक चक्र आहे, ज्या गोष्टीची सुरुवात होते तिचा शेवट हा नक्कीच होतो. निसर्गाचा हा कालचक्राचा नियम गणेश विसर्जनातून दिसून येतो. निसर्गाच्या अंशापासून गणपतीची मूर्ती तयार होते आणि शेवटी निसर्गतःच ती विलीन होते. गणेश विसर्जनाच्या वेळेस विसर्जन हे फक्त मूर्तीचेच करायचे नसते तर आपल्यातील दुर्गुणांचे सुद्धा करायचे असते.

अनंत चतुर्दशीचा दिवस, एकट्या मुंबईत वर्षाला सुमारे दीड लाख मूर्तींचे विसर्जन केले जाते. गणपती विसर्जन पाण्यातच का केले जाते, या विधी मागे सुद्धा काही धार्मिक कारणे आहेत. तसेच हिंदू धर्मात अनेक विधी हे निसर्गाशी निगडीत आहे. निसर्गाशी एकरूपता राखण्याचा संदेश वेगवेगळ्या पद्धतीने कायमच दिला जातो, गणपती विसर्जनांच्या बाबतीतही असेच आहे. ज्यावेळी महर्षी व्यास महाभारताची निर्मिती करत होते, त्यावेळी गणपती बाप्पा लेखनिकाची भूमिका बजावत होते. महाभारत लिहिण्याचे काम हे दहा दिवस अविरतपणे चालू होते. त्यामुळे गणपती बाप्पांनी शरीर गरम न व्हावे म्हणून अंगाला माती लिंपल्याचे उल्लेख आहे. हा गणपती बाप्पांचा विशेष अवतार असल्यामुळे त्यांना दहा दिवसानंतर जलसमाधी देतात अशी वंदता आहे. कदाचित या दहा दिवसात बाप्पाची ऊर्जा टिकून राहावी म्हणून नैवेद्यासाठी गोडधोड, मोदक वगैरे करण्याची परंपरा आहे. अहोरात्र लिहिण्याच्या कामामुळे शरीर उष्ण झाल्यामुळे पाण्यात डुबकी मारल्याविना गत्यंतर नव्हती असेही अख्यायिका आहे. त्यामुळे गणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी करतात.

गणेश विसर्जन हा आपल्या संस्कृतीतील श्रद्धा, भक्ती आणि एकात्मतेचा उत्सव आहे. मात्र तो पर्यावरणाच्या हानीचा कारणीभूत ठरू नये. 'बाप्पा पुन्हा वर्षी लवकर या'असे गजर करताना आपण त्याला प्रदूषित नद्या, रासायनिक कचऱ्याचा डोंगर दाखवला तर ती खरी भक्ती ठरेल का? आता वेळ आली आहे की श्रद्धा आणि जबाबदारी यांचा समतोल राखावा. गणेशोत्सव पर्यावरणपूरक झाला तरच आपले मोरया खऱ्या अर्थाने गजर ठरेल.*****

-प्रविण बागडे,नागपूर

# समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी नवनाथ भाऊ पवार



सांगोला : सांगोला शहर व तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविणे व शासनाच्या विविध योजनेचा लाभ ज्येष्ठ नागरिकांना मिळवून देण्यासाठी मागच्या १०/११ वर्षापासून सातत्याने सेवाभावी वृत्तीने कार्यरत असलेल्या समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ सांगोला या संघाच्या अध्यक्षपदी सांगोला नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष व उद्योगपती श्री नवनाथ भाऊ पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सांगोला येथील समर्थ जेष्ठ नागरिक संघाच्या सदस्यांची बैठक नुकतीच ज्येष्ठ नागरिक श्री तात्यासाहेब केदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी बिनविरोध करण्यात आल्या. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

संघाच्या सचिवपदी सेवानिवृत्त केंद्रप्रमुख श्री वसंत बजरंग दिघे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष म्हणून अरुण तुकाराम वाघमोडे. खजिनदार म्हणून बाबासाहेब मच्छिंद्र बनसोडे यांची तर सहसचिव पदी डॉ. अनिल विठ्ठल कांबळे यांची निवड करण्यात आली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

कार्यकारणी सदस्य म्हणून श्री माणिक सदाशिव भोसले, श्री.नामदेव रामचंद्र फुले, श्री.नानासो गणपत पाटील, श्री.तानाजीराव हरिबा घाडगे, श्री.सोपान बापू माळी, श्री.तात्यासो नानासो केदार, श्री.सुखदेव बापू आनंदा जांगळे, श्री.धनंजय भगवान शेंडे, श्री.गंगाराम दत्तू इमडे, श्री. बाळासो नारायण काकडे, श्री शंकर माधव जाधव, श्री.आनंदा पांडुरंग कांबळे, श्री. शिवाजीराव गणपतराव पवार, हाजी बशीर भाई शरफोद्दीन तांबोळी आणि श्री.मोहन शंकर मस्के यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४२ वे अंक-४१ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# मराठा आरक्षण आंदोलनाला यश; सांगोला तालुक्यात आनंदोत्सव



सांगोला : मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आजाद मैदानावर सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाला यश मिळाले असून, महाराष्ट्र सरकारने मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेतल्यामुळे सांगोला शहर व तालुक्यात मराठा समाज बांधवांनी मोठा जल्लोष केला. मनोज जरांगे पाटील यांनी २ सप्टेंबर रोजी आपण जिंकलो असे जाहीर करत आंदोलन मागे घेतले. त्यानंतर आरक्षणाच्या लढ्यात सहभागी झालेले सांगोल्यातील मराठा बांधव ३ सप्टेंबर रोजी सकाळी परतले. सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचताच मुंबईवरून आलेल्या मराठा बांधवांसह स्थानिक बांधवांनी फटाक्यांची आतषबाजी करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला व उत्स्फूर्त घोषणा देत वातावरण असून, आंदोलनात सहभागी सर्व बांधवांनी एकदिलाने केलेल्या संघर्षाचे फळ अखेर गोड झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

मनोज जरांगे पाटील हे मुंबई येथे आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेले होते. मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी सांगोला तालुक्यातील तब्बल ७०० गाड्या मुंबईकडे रवाना झाल्या होत्या. या आंदोलनात सांगोला तालुक्यातील २० गाड्यांमधून भाकरी, चटणी, फळे व पाण्याच्या बाटल्यांची व्यवस्था करून आंदोलनात सहभागी झालेल्या बांधवांना जेवणाची सोय करण्यात आली होती.

या संपूर्ण आंदोलनात सांगोला तालुक्यातील युवक, शेतकरी, मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आनंद व्यक्त केला. सरकारने मराठा आरक्षणासंदर्भातील मागण्या मान्य केल्याची घोषणा होताच जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले. या निर्णयाचे स्वागत करत गेली दोन दिवस सांगोला शहरासह ग्रामीण भागात मराठा समाज बांधवांनी फटाके फोडून, जय भवानी, जय शिवाजी, एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत आनंदोत्सव साजरा केला.

सांगोल्यातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मोठ्या संख्येने मराठा बांधवांनी चौकात एकत्र येऊन घोषणाबाजी केली. तर ग्रामीण भागात काही गावांमध्ये गुलाल उधळत हलगी-ढोलाच्या तालावर समाज बांधवांनी नृत्य करून आपला आनंद व्यक्त केला. या निर्णयामुळे मराठा समाजामध्ये उत्साहाचे आरक्षण मिळाल्यानंतर झालेला आनंदोत्सव हा ऐतिहासिक ठरला असून छत्रपती शिवाजी महाराज चौकात लोकांचा उत्साह पाहण्यासारखा होता. यावेळी सांगोला शहरातील श्रीराम तरुण मंडळातर्फे विशेष उपक्रम राबविण्यात आला. मुंबईकडे निघालेल्या मराठा बांधवांच्या गाड्यांना चौकात थांबवून मंडळाच्या गणपतीची आरती करण्यात आली व चिवडा-लाडूचे पाकीट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

आरक्षण मिळाल्यानंतर पुन्हा एकदा बांधव चौकात परतल्यावर श्रीराम तरुण मंडळाने मराठा बांधवांच्या हस्ते गणरायाची आरती घडवून आणली. तसेच मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण झाल्या या आनंदात मंडळाच्या वतीने जिलेबीचे वाटप करण्यात आले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय व डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कारासाठी ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करावेत

सोलापूर : उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयांकडून जनतेला अधिक चांगल्या ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येतात. राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क, ड वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे रु.१ लक्ष, रु.७५ हजार, रु.५० हजार , रु. २५ हजार इ. रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येते. राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी रु.५० हजार तसेच राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी रु. २५ हजार इ. रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येते. सन २०२४-२५ या वर्षाच्या पुरस्कारासाठी इच्छुक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक (ग्रंथमित्र) यांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत तीन प्रतीत आपल्या जिल्हयातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांकडे पाठवावेत असे आवाहन अशोक मा. गाडेकर, प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

## फॅबटेक मध्ये अँन्टी रॅगिंग अवेरनेस विषयावर व्याख्यान संपन्न




सांगोला : फॅब्रटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभागात ॲन्टी रॅगिंग अवेरनेस विषयावर ॲड. आयुब पटेल यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान मोठ्या उत्साहात संपन्न झाले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे यांनी दिली. सुरवातीस ॲड.आयुब पटेल यांचे महाविद्यालयाच्या वतीने कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. तानाजी धायगुडे यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

ॲड.आयुब पटेल म्हणाले, रॅगिंग हे अक्षम्य कृत्य असुन कायद्याने ही कृती गुन्हा म्हणून गणली जाते. रॅगिंग रोखण्यासाठी न्यायालयाने अनेक कडक कायदे केले आहेत. महाविद्यालयाच्या आवारात शिस्तीचे पालन करून खेळीमेळीचाया वातावरणात शैक्षणिक ज्ञान आत्मसात करून करिअर करावे. ॲन्टी रॅगिंग मुळे अनेकांचे आयुष्य बरबाद झाले असल्याचे मत ॲड. आयुब पटेल यांनी फॅब्रटेक मध्ये बोलताना व्यक्त केले.

कार्यक्रमास स्टुडंट डिन डॉ. संजय पवार हे उपस्थित होते. हे व्याख्यान यशस्वी करण्यासाठी डॉ. तृप्ती बनसोडे, प्रा.आशिष जाधव, प्रा.गजानन काळे, प्रा.नवनाथ चांडोले, प्रा.अभिमान होनकळस, प्रा.महेश वाघमारे, प्रा. ऋषिकेश पाटील, प्रा. श्रीराम डांगे, प्रा.माधुरी सुरवसे, प्रा. स्वाती राऊत, प्रा. चैत्राली धुमाळ, प्रा. श्रद्धा सराफ आदींसह कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. गजानन काळे यांनी केले.

# मराठा आरक्षणाचे जनक देवेंद्र फडणवीस - चेतनसिंह केदार सावंत



सांगोला : महाराष्ट्रात मराठा समाजाला आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणाच्या आधारावर शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षण मिळावे, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पुढे येत आहे. मराठा आरक्षणाचा लढा आजचा नाही. १९८० च्या दशकापासून आरक्षणाची मागणी होत आहे. या काळात शरद पवार तब्बल चारवेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. उद्धव ठाकरे एकदा मुख्यमंत्री होते. पण त्यांनी आपल्या सत्ता काळात आरक्षण का दिले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार सकारात्मक आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच मराठा समाजाला दोनवेळा आरक्षण मिळवून दिल्याने मराठा आरक्षणाचे जनक देवेंद्र फडणवीस हेच आहेत असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केले.

२०१४ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीकडे केवळ सहानुभूतीपूर्वक न पाहता सकारात्मक प्रतिसाद दिला. २०१८ मध्ये त्यांनी मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) प्रवर्गातून विधीमंडळाच्या माध्यमातून एकमताने १६ टक्के आरक्षण मिळवून दिले होते. त्यानंतर मात्र राज्यात २०१९ मध्ये सत्तांतर झाले आणि राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आले. या सरकारच्या कारकिर्दीत मराठा आरक्षणाच्या लढ्याला आवश्यक ती गती न मिळाल्याने, ५ मे २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने, हे आरक्षण ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडत असल्याचे सांगून, ते रद्द केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम केले. जून २०२२ मध्ये राज्यात पुन्हा एकदा सत्तांतर झाले. राज्यात महायुतीचे सरकार आले.

या सरकारने मराठा आरक्षणाचा मुद्दा प्रभावीपणे हाती घेतला. २०२४ च्या फेब्रुवारी महिन्यात महायुती सरकारने विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात मराठा आरक्षण विधेयक २०२४ सादर करून, ते एकमताने मंजूर केले. या विधेयकाद्वारे मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकरीत १० टक्के आरक्षण देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाच्या मूळ प्रश्नावर भर देत अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या तीन नवीन योजना सुरू करून ८०० कोटीपेक्षा अधिक निधी दिला. मराठा समाजातील मुलांना शिक्षणासाठी मदत करताना राज्य सरकारने राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सुरु केली.

मराठा समाजाला देवेंद्र फडणवीस यांनी टिकणारे आरक्षण दिले, इतर एकाही मुख्यमंत्र्यांना मराठा समाजाला आरक्षण देता आले नाही. ते आरक्षण देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप युती सरकारने २०१८ साली कायदा करून मराठा समाजाला सरकारी नोकरी व शिक्षणात आरक्षण दिले. त्यामुळे मराठा समाजाची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली. देवेंद्र फडणवीस सरकारने वेगवेगळ्या माध्यमातून मराठा समाजातील घटकांसाठी काम केले. मराठा समाजाला आरक्षण मिळूच शकणार नाही, असे काही लोक म्हणत होते. त्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठ्यांना आरक्षण मिळवून दिले होते. मात्र, फडणवीस यांचे सरकार पायउतार झाल्यानंतर काही लोक मराठ्यांच्या आरक्षणाविरोधात न्यायालयात गेले होते. न्यायालयाने हे आरक्षण रद्द केल्याने या आरक्षणाचा लाभ समाजाला मिळू शकला नव्हता. मराठा समाजातील गरजू लोकांना आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरू होते.

मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. मात्र, ते घटनेत आणि कायद्यात टिकायला हवे. महायुतीचे सरकार मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आग्रही आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनीच मराठा समाजाला आरक्षण मिळवून दिले आहे. आतापर्यंत अनेक मराठा मुख्यमंत्री असताना देखील मराठा आरक्षण देऊ शकले नव्हते. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला आरक्षण दिलं आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचे जनक देवेंद्र फडणवीस आहेत असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केले.

# नव्यानेच बांधण्यात आलेल्या इनडोअर स्टेडिअममध्ये रंगणार बास्केटबॉल स्पर्धेचा थरार

## कै.गुरुवर्य चं.वि.तथा बापूसाहेब झपके ४४ वा स्मृतीसमारोह विविध कार्यक्रमांनी होणार साजरा



सांगोला : सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, थोर स्वातंत्र्यसेनानी, सांगोला तालुक्यात माध्यमिक शिक्षणाची सुविधा सर्वप्रथम प्रदान करणारे शिक्षणमहर्षि व सांगोला,नाझरा,कोळा विद्यामंदिर प्रशालेचे जनक कै.गुरुवर्य चं. वि. तथा बापूसाहेब झपके ४४ वा. स्मृतीसमारोह विविध कार्यक्रमांनी संपन्न होत आहे.यामध्ये मंगळवार दि.९ सप्टेंबर २०२५ रोजी ८ वी ते १०वी व ११वी १२ वी गट जिल्ह्यास्तरीय वक्तृत्व स्पर्धा व बुधवार दि.१० सप्टेंबर २०२५ रोजी ५ वी ते ७ वी गट तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न होणार आहेत.

तसेच दि.१२ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर २०२५ रोजी पुरूषांच्या निमंत्रित राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धा संपन्न होणार आहेत. यावर्षीपासून नव्यानेच बांधण्यात आलेल्या इनडोअर स्टेडिअममध्ये बास्केटबॉल स्पर्धेचा थरार रंगणार असून क्रीडाप्रेमींना हे सामने पर्वणीच ठरणार आहे.

या स्पर्धेचा उदघाटन समारंभ पदवीधर मतदार संघ,पुणे विभागाचे आमदार अरुण (अण्णा) लाड यांचे शुभहस्ते, सांगोला विधानसभा सदस्य आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे अध्यक्षतेखाली व उपसंचालक क्रीडा व युवक सेवा पुणे युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी सोलापूर नरेंद्र पवार, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड यांचे प्रमुख उपस्थितीत शुक्रवार दि.१२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक १० वाजता सांगोला विद्यामंदिर सांगोला येथे संपन्न होणार आहे.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार दि.१४ सप्टेंबर रोजी सायं.५.००वा आंतरराष्ट्रीय धावपटू, उपायुक्त– महानगरपालिका नवी मुंबई ललिता बाबर यांचे शुभहस्ते व कर्णधार, विश्वविजेता भारतीय महिला खो–खो संघ व क्रीडा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कु.प्रियंका इंगळे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमासाठी उद्योगपती सिद्धार्थ झपके, विलास क्षीरसागर, सुहास होनराव, ज्ञानेश्वर तेली ,नागेश तेली, श्रीकांत देशपांडे,मंगेश म्हमाणे,रत्नाकर ठोंबरे यांची उपस्थिती आहे. मंगळवार दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ७.०० वा.समाधी दर्शन, ८.०० वा.सांगोला विद्यामंदिर सांगोला येथे कै.बापूसाहेब झपके यांचे तैलचित्रास पुष्पहार समर्पित करण्यात येणार आहे व सकाळी १० वाजता कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारोह सांगता समारंभ प्रमुख पाहुणे राहुल गिरी प्रसिद्ध व्याख्याते बीड यांचे शुभहस्ते व संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या समारंभामध्ये कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण होणार असल्याची माहिती सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, प्राचार्य अमोल गायकवाड, सांगोला शहर व तालुका बास्केटबॉल असोसिएशनचे सचिव प्रशांत मस्के, नरेंद्र होनराव, धनाजी चव्हाण, सचिन पाटणे, शंभू झपके उपस्थित होते.

यावर्षीपासून राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धा ४२ वर्षाच्या यशस्वी आयोजनामुळे स्मृतीसमारोह समारंभानिमित्त आयोजीत करण्यात येणाऱ्या बास्केटबॉल स्पर्धेचा महाराष्ट्र राज्यात नावलौकिक आहे.

या स्पर्धेतील खेळाडूंनी राज्यासह देशाचेही प्रतिनिधीत्व केले आहे. त्यामुळे यावर्षीपासून विविध राज्यातील संघ व खेळाडूंच्या मागणीमुळे पुरुषांच्या निमंत्रित राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धा होणार असून केरळ, आंध्रप्रदेश, गुलबर्गा, कर्नाटक हे संघ या वर्षी सांगोल्यात येणार आहेत.

# नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून सांगोल्यात ४८०० किलोग्राम निर्माल्य संकलन




सांगोला : सांगोला येथे श्री अनंत चतुर्दशी दिवशी शनिवार दिनांक ६ सप्टेंबर २०२५ रोजी डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा, तालुकाअलिबाग जिल्हा रायगड यांच्या सौजन्याने डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे घरगुती व सार्वजनिक मंडळाच्या श्री गणेश मूर्ती पुढील निर्माल्य (हार फुले दुर्वा फळे इत्यादी) संकलन करून त्यापासून कंपोस्ट खत निर्मिती कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमाचे उद्घाटन सांगोला नगरपरिषद मुख्याधिकारी निरीक्षक डॉ.सुधीर गवळी, स्वच्छता निरीक्षक श्री विनोद सर्वगोड यांच्या हस्ते करण्यात आले.

सदर उपक्रमास प्रतिष्ठानच्या श्री बैठक सांगोला, कडलास ,आलेगावं, अजनाळे, खर्डी, भाळवणी येथील ३२७ श्री सदस्यांनी सकाळी ८ वाजल्यापासून रात्री नऊ पर्यंत निर्माल्य संकलन केले. सांगोला परिसरातील घरगुती गणपती १२०१ व मंडळाचे ३२ गणपती विसर्जित करण्यात आले असून सुमारे ४८०० किलोग्राम निर्माल्य संकलन करण्यात आले.

डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान निर्माल्य कलश या अभिनव उपक्रमाची सुरुवात केली. या कलशात जमा झालेले निर्माल्य थेट पाण्यात न टाकता त्याचा जैविक खतासाठी पुनर्वापर केला जातो. हे खत म्हणून प्रतिष्ठानने लावलेल्या वृक्ष लागवडीला वापरले जाते. आजच्या काळात स्वच्छता ही सेवा हा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचवणे अत्यंत महत्त्वाचे आहे डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान केवळ धार्मिक संस्था नसून सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यवर्धन व पर्यावरण संवर्धन यासाठी झटणारी समाजशक्ती आहे.

या उपक्रमामुळे आपल्याला स्वच्छतेचे महत्त्व समजते, पर्यावरणाचे रक्षण होते आणि पुढच्या पिढ्यांसाठी स्वच्छ निरोगी वातावरण तयार करण्याची संधी मिळते. आजपर्यंत प्रतिष्ठानच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामस्वच्छता अभियान, महाआरोग्य शिबीर,रक्तदान शिबिर, प्रौढ साक्षरता अभियान, व्यसनमुक्ती, जलाशय स्वच्छता, विहीर पुनर्भरण,शालेय पुस्तकांचे वाटप, कुरण व्यवस्थापन असे विविध उपक्रम अविरत सुरू आहेत. तसेच प्रतिष्ठान मार्फत पंढरपूर, मंगळवेढा व अकलूज येथे सुद्धा निर्माल्य संकलनाचे कार्य करण्यात आले.

# आपुलकी प्रतिष्ठानची वार्षिक सभा उत्साहात संपन्न



सांगोला : आपुलकी प्रतिष्ठान सांगोला या संस्थेची चौथी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांच्या अध्यक्षतेखाली आपुलकी प्रतिष्ठानच्या कार्यालयात रविवार दि. ७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता चौथी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. प्रारंभी सचिव संतोष महिमकर यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत संतोष महिमकर यांनी वाचून दाखवल्यानंतर तो कायम करण्यात आला.

सन २०२४–२५ चा अहवाल व २०२४–२५ चा वार्षिक जमा–खर्च सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानंतर २०२५–२६ चे संचालक मंडळाने तयार केलेले वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले. सन २०२५–२६ सालासाठी ऑडिटरची नेमणुक करण्यात आल्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी आलेल्या विषयावर चर्चा झाली.

सभेसाठी उपस्थित सदस्यांचे आभार अरविंद केदार यांनी मानले. अल्पपहाराने सभेची सांगता झाली. या सभेला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांगोला तालुका ग्रंथालय संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

सांगोला : सांगोला तालुका ग्रंथालय संघ सांगोला या संस्थेची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. ग्रंथालय संघाचे अध्यक्ष हरिदास घोडके यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सोसायटी शाखा – सांगोला येथील कार्यालयात वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. प्रारंभी सचिव अशोक व्हटे यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत अशोक व्हटे यांनी वाचून दाखवल्यानंतर तो कायम करण्यात आला. सन २०२४–२५ चा वार्षिक अहवाल व २०२४–२५ चा वार्षिक जमा–खर्च सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानंतर २०२५–२६ चे संचालक मंडळाने तयार केलेले वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले. सन २०२५–२६ सालासाठी ऑडिटरची नेमणुक करण्यात आल्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी आलेल्या विषयावर चर्चा झाली. आभार संस्थेचे कार्याध्यक्ष मच्छिंद्र मिसाळ यांनी मानले. या सभेला तालुक्यातील वाचनालय प्रतिनिधी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरचे सभेचे नियोजनाबाबत ग्रंथालय संघाचे संचालक, पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# सांगोला महाविद्यालय विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेत व्दितीय




सांगोला : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आयोजित दि.०३ व ०४ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या आंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेचा समारोप सांगोला महाविद्यालयाच्या क्रीडाभवनात उत्साहात संपन्न झाला.

या स्पर्धेत सांगोला महाविद्यालयातील मुलींच्या संघाने उल्लेखनीय खेळ करून व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या स्पर्धेत विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील अनेक संघांनी सहभाग घेतला होता. मुलांच्या संघामध्ये संगमेश्वर कॉलेज सोलापूर प्रथम क्रमांक, सोशल कॉलेज सोलापूर व्दितीय क्रमांक आणि हिराचंद नेमचंद कॉलेज सोलापूर तृतीय क्रमांक मिळवला. तसेच मुलींच्या संघामध्ये वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी प्रथम क्रमांक, सांगोला महाविद्यालय सांगोला व्दितीय क्रमांक आणि फार्मसी कॉलेज सोलापूर तृतीय क्रमांक मिळवला. निवड केलेल्या खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. या स्पर्धेसाठी डॉ. सुरेश लांडगे सर शारीरिक शिक्षण शास्त्र कॉलेज बार्शी, प्रा नंदकिशोर देशपांडे सर अकलूज कॉलेज यांनी ही या स्पर्धेसाठी प्रमुख उपस्थिती दर्शवली.

त्याचबरोबर विद्यापीठ संघ निवड समिती मध्ये डॉ. प्रशांत तांबिले, डॉ. महेश डेंबरे आणि डॉ. स्मिता सुरवसे हे ही उपस्थित होते. महाविद्यालयातील मुलींच्या संघाने व्दितीय क्रमांक मिळवला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष बाबुरावजी गायकवाड, संस्थेचे सचिव ॲड.उदय(बापू) घोंगडे, संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी महाविद्यालयातील संघाचे कौतुक केले.

या संघास मार्गदर्शन करणारे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले व क्रीडा शिक्षक प्रा.जगदीश चेडे यांनी संघाचे विशेष कौतुक केले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, क्रीडा समिती सदस्य, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व क्रीडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनीही संघाचे कौतुक करून पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.